सबसे 'तेज' ग्लोबल महातेज...!

Postal Regd. No. JAL/443/2025-2027

# ग्लोबल महातेज

https://epaper.globalmahatej.com/

RNI. NO. MAHBIL /25/A0192

वर्ष १ ले | अंक : २७६ | रविवार, दि. २८ जून २०२६ | पाने : ४ | अमळनेर | किंमत : ३ रुपये | Email - globalmahatej@gmail.com

**रवि ज्वेलर्स**
सराफ बाजार, अमळनेर.
मो. ७०७४७४२९२१

**सोने-चांदी**

**आजचे भाव**

| | |
|---|---|
| २४ Ct सोने ९९.५०% | ₹ १४५००० |
| २२ Ct सोने ९१.६०% | ₹ १३२००० |
| १८ Ct सोने ७५.००% | ₹ ११०५०० |
| शुद्ध चांदी ९९९% | ₹ २३१०/- |

भाव प्रती १० ग्राम

# कारवाईची धास्ती; छुप्या मार्गातून मस्ती!

## १० रुपयांच्या गुटखापुडीची ४० रुपयांत विक्री

**ग्लोबल महातेज वृत्तसेवा**

अमळनेर : राज्यात प्रशासनाकडून गुटखाविरोधात सुरू असलेल्या कठोर कारवाईमुळे अनेक व्यावसायिकांमध्ये धास्तीचे वातावरण निर्माण झाले आहे. विशेषतः आयुक्त तुकाराम मुंढे यांच्या राज्यातील कारवाईनंतर अनेक ठिकाणी गुटखा पुरवठ्यावर परिणाम झाल्याचे चित्र आहे. अमळनेर तालुक्यात गुटखा सहज उपलब्ध होत नसल्याने पानटपरी चालकांची शहरातील बाजारपेठेत अक्षरशः धावपळ सुरू झाली आहे. दोन पैसे जास्त घ्या; पण माल द्या, अशी विनंती करत अनेक




पानटपरी चालक बाजारपेठेतील कानाकोपऱ्यात चौकशी करत फिरताना दिसत आहेत. दुसरीकडे गुटख्याचे व्यसन असलेल्या गुटखाप्रेमींचीही मोठी गैरसोय होत असून तल्लफ भागविण्यासाठी त्यांना दुकान-दुकान भटकंती करावी लागत असल्याचे चित्र आहे.

काही दुकानदारांकडे पूर्वीपासूनच गुटख्याचा साठा शिल्लक असल्याने परिस्थितीचा फायदा घेत दर वाढविण्यात आल्याचे बोलले जात आहे. साधारणतः १० रुपयांत मिळणारी गुटख्याची पुडी आता ३५ ते ४० रुपयांपर्यंत विकली जात असल्याची चर्चा आहे. वाढीव दर असूनही गुप्तपणे या वस्तूंची विक्री सुरू असल्याचा आरोप होत आहे. विशेष म्हणजे काही ठिकाणी दुकानदारांनी गुटख्याचा माल उघडपणे न ठेवता दुकानातील वेगवेगळ्या ठिकाणी, आडोशाला किंवा लपवून ठेवत ग्राहकांना गुप्तपणे विक्री केल्याचेही नागरिकांकडून सांगितले जात आहे. प्रशासनाच्या कारवाईनंतरही कानाकोपऱ्यातून सुरू असलेल्या या व्यवहाराकडे आता संबंधित विभाग काय कारवाई करणार, याकडे नागरिकांचे लक्ष लागले आहे.




**अमळनेर : शिवसेनेचे (शिंदे गट) खासदार संजय दिना पाटील यांनी पत्रकारांना केलेल्या अपमानास्पद वक्तव्याचा निषेध करून त्यांच्यावर तातडीने कठोर कारवाई व्हावी, या मागणीचे शनिवार, दि. २७ जून रोजी अमळनेर तालुका पत्रकार संघाच्या वतीने पोलीस निरीक्षक दत्तात्रय निकम यांना निवेदन देण्यात आले. यावेळी उपस्थित अमळनेर शहर व तालुका पत्रकार संघाचे अध्यक्ष चेतन राजपूत, ज्येष्ठ पत्रकार पांडुरंग पाटील, संजय पाटील, जितेंद्र ठाकूर, महेंद्र पाटील, बाबूलाल पाटील, हिरालाल पाटील, डॉ. विलास पाटील, संभाजी देवरे, संदीप सोनवणे, डॉ. युवराज पाटील, विजय पाटील, महेंद्र रामोशे, विक्की जाधव, कुंदन खैरनार, मुन्ना शेख, रवींद्र मोरे, काशिनाथ चौधरी आदी.**



*अमळनेर : 'श्री मंगळग्रह मंदिरा'साठी 'एसटी विनंती थांबा' या अधिकृत फलकाचे शुक्रवार, दि. २६ जून रोजी अनावरण झाले. याप्रसंगी उपस्थित शिवसेना युवा सेनेंतर्गत अमळनेर शहर तीर्थक्षेत्र प्रमुख मनीष चौधरी, अमोल धनगर, नागराज धनगर, हितेश चौधरी, अभियंता निखिल चौधरी, तसेच आम आदमी पार्टीचे महेंद्र साळुंखे, मोहन मनोरे, रामकृष्ण पाटील-देवरे आदी.*

# अमळनेरच्या 'मंगळग्रह मंदिरा'साठी 'एसटी'चा विनंती थांबा सुरू

## गैरसोय थांबली; युवा सेनेच्या मनीष चौधरींचा पुढाकार

**ग्लोबल महातेज वृत्तसेवा**

अमळनेर : येथील श्री मंगळग्रह मंदिर परिसरात येणाऱ्या भाविकांसह ग्रामीण व शहरी भागातील प्रवाशांची महाराष्ट्र राज्य मार्ग परिवहन महामंडळाची (एस.टी.) बस थांबत नसल्याने मोठी गैरसोय होत होती. त्यामुळे ही गैरसोय लक्षात घेऊन 'श्री मंगळग्रह मंदिरा'साठी 'एसटी विनंती थांबा' या अधिकृत फलकाचे शुक्रवार, दि. २६ जून रोजी अनावरण करण्यात आले. हा उपक्रम शिवसेना युवा सेना अंतर्गत अमळनेर शहर तीर्थक्षेत्र प्रमुख मनीष हरिश्चंद्र चौधरी तसेच आम आदमी पार्टी यांच्या संयुक्तिक पुढाकारातून साकारण्यात आला.

या थांब्यामुळे अमळनेरहून जळगावकडे तसेच जळगावहून अमळनेरकडे येणाऱ्या व जाणाऱ्या भाविक तसेच प्रवाशांची गैरसोय थांबणार आहे. श्री मंगळग्रह मंदिर परिसरातील नागरिक व भाविकांना बससाठी दूरपर्यंत चालत जावे लागत असल्याने सातत्याने यासंदर्भात मागणी होत होती. या मागणीची दखल घेत हा जनहिताचा उपक्रम राबविण्यात आल्याची माहिती यावेळी संबंधितांकडून देण्यात आली. फलक अनावरण कार्यक्रमास शिवसेना युवा सेना अंतर्गत अमळनेर शहर तीर्थक्षेत्र प्रमुख मनीष चौधरी, अमोल धनगर, नागोराज धनगर, अभियंता निखिल चौधरी, हितेश चौधरी तसेच आम आदमी पार्टीचे महेंद्र साळुंखे, मोहन मनोरे, रामकृष्ण चिंतामण पाटील (देवरे), राजेंद्र बाळकृष्ण जाधव यांच्यासह विविध क्षेत्रांतील मान्यवर व नागरिक मोठ्या संख्येने उपस्थित होते.

यावेळी उपस्थितांनी या उपक्रमाचे स्वागत करत परिसरातील प्रवाशांना याचा मोठा लाभ होणार असल्याचे मत व्यक्त केले. नागरिकांच्या दैनंदिन सुविधांसाठी अशा प्रकारचे उपक्रम पुढेही राबविण्यात येतील, असा विश्वास याप्रसंगी आयोजकांनी व्यक्त केला.







**श्री. मनोहर तायडे**
सेवेकरी, मंगळ ग्रह मंदिर




**श्री. संदीप सैंदाणे**
अमळनेर



**सौ. सुनंदा सोनार**
अमळनेर



**श्री. योगेश्वर उपासनी महाराज**
अमळनेर



**श्री. धनराज महाजन**
अमळनेर



**श्री. राजेंद्रकुमार सूर्यवंशी**
अमळनेर



**श्री. मुकेश पाटील**
अमळनेर



**श्री. हर्षल जैन**
अमळनेर

**छत्रपती शिवाजी महाराजांचा इतिहास दोन राष्ट्रांना जोडणार!**

पान २ वर

**गर्व से कहो स्वदेशी है हम...!**
**स्वदेशी ही खरिदेंगे हम...!!**

स्वातंत्र्यपूर्व संग्रामातील स्वदेशीची हाक आता पुन्हा देवू या. नवरात्रोत्सवात आपण आदिमाया आदिशक्तीचा जागर करतो त्याप्रमाणेच स्वदेशीचाही जागर करूया..! सच्च्या भारतीयांवर जेव्हा-जेव्हा परकीय आक्रमण होते तेंव्हा-तेंव्हा ते प्रचंड त्वेषाने पेटून उठतात...!! आता तीच वेळ येऊन ठेपली आहे...!!!
जय भारत...!
जय स्वदेशी...!!

# माजी विद्यार्थी राहुल कुंभारचा शाळेचे ऋण फेडीचा प्रयत्न

## मंगरूळच्या माध्यमिक शाळेतील विद्यार्थ्यांना केले मोफत दप्तर वाटप

**ग्लोबल महातेज वृत्तसेवा**


अमळनेर : तालुक्यातील मंगरूळ येथील ग्रामविकास शिक्षण मंडळ संचलित स्व. आबासो. अनिल अंबर पाटील माध्यमिक विद्यालयात माजी विद्यार्थी राहुल मधुकर कुंभार यांनी आई, शिक्षक आणि शाळेबद्दलची कृतज्ञता व्यक्त करत शंभर विद्यार्थ्यांना मोफत दप्तर वाटप केले. राहुल हा मंगरूळच्या शाळेचा माजी विद्यार्थी असून, विद्यार्थ्यांना विविध शैक्षणिक सुविधा मिळाव्यात आणि त्यांच्यात समानता निर्माण व्हावी म्हणून हा उपक्रम राबविल्याचे सांगितले जाते.

आई ही आयुष्यातील पहिला गुरू असते. त्यांनतर शाळेतील शिक्षक मूल्ये आणि संस्कार रुजवत असतात. त्यांच्या शिकविण्याने आणि शिस्तीने आज मोठा व्यावसायिक झालो असून, त्यांच्या ऋणातून कधीही मुक्त होऊ शकणार नाही. मात्र, त्या ऋणातून उतराई होण्याचा हा छोटासा प्रयत्न म्हणून आई वजाबाई यांच्या नावाने विद्यार्थ्यांना दप्तर वाटप करण्यात आल्याचे राहुल यांनी याप्रसंगी सांगितले.

मुख्याध्यापक प्रकाश पाटील यांनी राहुल यांचा, तर संस्थाचालक श्रीमती पीयूषाताई पाटील यांनी त्याची आई श्रीमती वजाबाई कुंभार यांचा यावेळी सत्कार केला. प्रमुख अतिथी ज्येष्ठ नागरिक कैलास कुंभार, लोटन बाबूराव कुंभार, लोटन रघुनाथ कुंभार, धुडकू कुंभार, समाधान कुंभार, पंकज पाटील, शत्रुघ्न पाटील यांच्या हस्ते विद्यार्थ्यांना दप्तर वाटप करण्यात आले. यावेळी अशोक सूर्यवंशी, प्रभुदास पाटील, राजेंद्र पाटील, सौ. सुषमाताई सोनवणे, सौ. शीतलताई चव्हाण, सौ. सीमाताई मोरे, राहुल पाटील, सौ. सीमाताई पाटील उपस्थित होते. उपशिक्षक संजय पाटील यांनी सूत्रसंचालन केले व आभार मानले.



*अमळनेर : तालुक्यातील मंगरूळ येथील ग्रामविकास शिक्षण मंडळ संचलित स्व. आबासो. अनिल अंबर पाटील माध्यमिक विद्यालयात माजी विद्यार्थी राहुल मधुकर कुंभार यांनी आई, शिक्षक आणि शाळेबद्दलची कृतज्ञता व्यक्त करत शंभर विद्यार्थ्यांना मोफत दप्तर वाटप केले. याप्रसंगी उपस्थित कैलास कुंभार, लोटन बाबूराव कुंभार, लोटन रघुनाथ कुंभार, धुडकू कुंभार, समाधान कुंभार, पंकज पाटील, शत्रुघ्न पाटील यांच्यासह संस्थाचालक श्रीमती पीयूषा पाटील, मुख्याध्यापक प्रकाश पाटील, उपशिक्षक संजय पाटील व शिक्षक वृंद.*



# लेकी असाव्या तर अशा..!

## २ मुलींनी वडिलांना दिले नवीन आयुष्य; एकीने किडनी तर दुसरीने दिले लिव्हर

**ग्लोबल महातेज वृत्तसेवा**

'फादर्स डे'च्या निमित्ताने गाझियाबादच्या मोरटा गावातील बाप-लेकीची प्रेरणादायी कहाणी समोर आली आहे. या कहाणीने अनेकांचे डोळे पाणावले. मुलगी घराची लक्ष्मी असते, आई बापाचा आधार असते असे नेहमी बोलले जाते. त्याचाच प्रत्यय गाझियाबादमधील २ मुलींना दिला आहे. वडील मृत्यूशी झुंज देत असताना डॉक्टरांनी त्यांना किडनी आणि लिव्हर ट्रान्सप्लांटची आवश्यकता असल्याचे कुटुंबाला सांगितले. त्यावेळी दोन्ही लेकी एक क्षणही न दवडता वडिलांचा जीव वाचवायला पुढे आल्या.

एका मुलीने स्वतःची किडनी तर दुसरीने लिव्हर देऊन वडिलांना नवीन आयुष्य दिले आहे. फादर्स डेच्या निमित्ताने लेकींनी दिलेली ही मौल्यवान भेट केवळ एका कुटुंबाची कहाणी नाही, तर मुलींचे अथांग प्रेम, धैर्य आणि कौटुंबिक प्रेमाचे प्रतीक आहे. ज्याची चर्चा आता संपूर्ण परिसरात होत आहे. गाझियाबादमधील मोरटा गावचे रहिवासी असलेले ४५ वर्षीय जयंत त्यागी, जे भाजपचे माजी पदाधिकारी आणि सध्या व्यावसायिक आहेत. गेल्या वर्षभरापासून ते आरोग्याच्या समस्यांनी ग्रस्त होते. सुरूवातीला त्यांच्यावर एका किरकोळ आजारासाठी उपचार करण्यात आले, परंतु तीन महिन्यांपूर्वी त्यांची प्रकृती अचानक खालावली. पोटाच्या गंभीर त्रासानंतर रुग्णालयात त्यांची सखोल तपासणी करण्यात आली आणि डॉक्टरांनी एक धक्कादायक खुलासा केला. त्यांची किडनी आणि लिव्हर दोन्हीही गंभीरपणे बाधित झाले होते आणि त्यांना वाचविण्यासाठी तातडीने प्रत्यारोपणाची आवश्यकता होती, असे तपासणी अहवालात आढळले. डॉक्टरांकडून हे ऐकून कुटुंब पूर्णपणे खचून गेले. एकीकडे वडिलांची ढासळती प्रकृती होती तर दुसरीकडे

पान २ वर

### ऋषिकाच्या निर्णयाला सासरच्यांनी दिला पाठिंबा

या संपूर्ण घटनेचा आणखी एक भावनिक पैलू सर्वात मोठी मुलगी ऋषिका हिच्याशी संबंधित आहे. ऋषिकाचे काही महिन्यांत लग्न होणार आहे. त्यामुळे या निर्णयाचा तिच्या वैवाहिक जीवनावर परिणाम होऊ शकतो अशी कुटुंबाला चिंता होती. मात्र जेव्हा ऋषिकाने तिच्या होणाऱ्या सासरच्या मंडळींना अवयवदानाबद्दल सांगितले तेव्हा त्यांनी सकारात्मक प्रतिसाद दिला. ऋषिकाच्या सासरच्या मंडळींनी तिच्या निर्णयाला केवळ पाठिंबाच दिला नाही तर तिला प्रोत्साहनही दिले. आपल्या आई-वडिलांसाठी इतका मोठा त्याग करणारी मुलगी खरोखरच एक प्रेरणा आहे आणि अशी धाडसी मुलगी त्यांच्या कुटुंबाचा भाग होणार असल्याचा त्यांना अभिमान आहे, असे सासरच्यांनी म्हटले.

## संपादकीय

# भारतच माझा देश...

भारताचे नागरिक नेमके कोण आणि ते सिद्ध करण्याचा पुरावा नेमका काय, हा सध्या देशातील सर्वांत जटिल प्रश्न होऊन बसला आहे. बालपणापासून 'भारत माझा देश आहे,' अशी प्रतिज्ञा म्हणत आलेल्या अनेक पिढ्यांना इतकी वर्षे आपण भारताचे नागरिक आहोत की नाही, याबाबत कधीच शंका आली नव्हती; पण सध्या वेगवेगळ्या सरकारी यंत्रणांना आपल्याच नागरिकांबाबत वारंवार प्रश्न पडू लागले आहेत. त्यांचे उत्तर देण्यासाठी फार पूर्वी रेशनकार्ड चालून जायचे; नंतर आर्थिक व्यवहारांसाठी पॅनकार्ड आले, मतदान करण्यासाठी मतदार ओळखपत्र आले आणि संयुक्त पुरोगामी सरकारच्या काळात बहुपयोगी 'आधार'सुद्धा कोट्यवधी नागरिकांनी काढले. अजूनही या सर्वांमध्ये पासपोर्ट हा भारतीय नागरिकांसाठी भरभक्कम आधार मानला जातो. मात्र, परराष्ट्र विभागाच्या अधिकाऱ्यांनी केलेल्या एका विधानामुळे देशात संभ्रम निर्माण झाला आहे. 'पासपोर्ट सेवा दिनी'च या विभागाच्या वतीने 'पासपोर्ट हा नागरिकत्वाचा पुरावा म्हणून ग्राह्य धरू नये,' असे ठासून सांगण्यात आले. परराष्ट्र विभागाच्या विधानात कायदेशीर तथ्य आहे; तसेच सर्वोच्च व उच्च न्यायालयांनीही तसे वेळोवेळी म्हटले आहे. नागरिकत्व सिद्ध करण्यासाठी 'काय चालणार नाही,' हे यातून समजते; पण 'कोणता पुरावा चालेल,' याचे 'अधिकृत' आणि सुस्पष्ट उत्तर सर्वसामान्य नागरिकांना हवे आहे.

आपण भारतीय नागरिक असल्याचे सिद्ध करण्याची गरज अपवाद वगळता आजवर फारशी भासली नव्हती. काही काळापूर्वी राष्ट्रीय नागरिकत्व नोंदणी (सीएए) आणि राष्ट्रीय नागरिक नोंदणीच्या (एनआरसी) निमित्ताने आसाममधील नागरिकांवर ती वेळ आली. गेल्या वर्षी बिहार, पश्चिम बंगालसह अन्य राज्यांमध्ये सुरू झालेली मतदारयादीची सखोल पडताळणी (एसआयआर) आणि जोडीला 'घुसखोरी'विषयक प्रचार, यामुळे नागरिकत्वाचा मुद्दा प्रकर्षाने चर्चेत आला. नागरिकत्व निश्चितीचा अंतिम अधिकार निवडणूक आयोगाला नसला, तरी केंद्रस्तरीय अधिकारी (बीएलओ) दारी उभा राहिल्यावर अनेकांची विनाकारण गाळण उडते, ही वस्तुस्थिती आहे. 'आधार' हा फक्त ओळखीचा पुरावा आहे, असे न्यायालयाने पूर्वीच स्पष्ट केले असून, पॅनकार्ड, मतदार ओळखपत्र ही विशिष्ट उद्देशांनी वापरली जाणारी कागदपत्रे आहेत. आजवर पासपोर्ट हा नागरिकत्वाचा बळकट पुरावा मानला जात असे, तोसुद्धा 'गैरसमज' असल्याचे आता स्पष्ट झाले आहे. पासपोर्ट हा सन १९६७च्या पासपोर्ट कायद्यानुसार मिळणारा दस्तावेज आहे; तर नागरिकत्व हे भारतीय नागरिकत्व कायद्यानुसार (१९५५) निश्चित केले जाते. त्यानुसार नागरिकत्व सिद्ध करण्यासाठी कोणतेही एक कागदपत्र पुरेसे नसून, जन्मदाखला, पालकांचे नागरिकत्व, शाळेच्या–जमीन किंवा रहिवास नोंदी आणि पासपोर्ट अशा निरनिराळ्या कागदपत्रांचा त्यासाठी एकत्रित विचार केला जातो. काही वर्षांपूर्वी तीन जणांनी पासपोर्ट, आधार आणि जन्मदाखला यांच्या आधारे केलेला नागरिकत्वाचा दावाही न्यायालयाने फेटाळला आहे.

या विभागांची भूमिका कागदावर योग्य वाटते. मात्र, सरकारचे वेगवेगळे विभाग परस्परविरोधी भूमिका घेतात, त्याचे काय? पासपोर्ट हा सर्व कागदपत्रे–पुराव्यांची, म्हणजेच ती व्यक्ती भारताची नागरिक असल्याची खातरजमा न करताच दिला जातो का, हा प्रश्न बाळबोध वाटला, तरी त्यात तथ्य आहेच. एकीकडे सरकारचे परराष्ट्र खाते पासपोर्टबाबत एक भूमिका मांडते; त्यावर सरकार चिडीचूप राहते आणि सत्ताधारी भारतीय जनता पक्षाच्या 'आयटी सेल'चे प्रमुख 'सरकारच्या वतीने' त्यावर खुलासा करतात, हा प्रकार गोंधळ उडवून देणारा असून, सत्ताधाऱ्यांचे ध्रुवीकरणाचे राजकारण व 'घुसखोरी'चा प्रचार त्यात भर घालणारा आहे. त्यामुळेच बहुसंख्य भारतीयांना चकित आणि सीमावर्ती राज्यांतील व कोणतीही कागदपत्रे नसलेल्या गरीब–निरक्षर व ग्रामीण भागातील नागरिकांना भयकंपित करणाऱ्या या प्रश्नांची तातडीने उत्तरे देणे गरजेचे आहे. नागरिकांना सतत भीतीच्या सावटाखाली ठेवणे योग्य नाही. अनावश्यक वितंडवादाऐवजी नेमक्या विधायक सूचना त्यासाठी महत्त्वाच्या आहेत. नागरिकत्व सिद्ध करणारे एकमेव कागदपत्र सध्या उपलब्ध नसले, तरी काँग्रेसचे नेते शशी थरूर यांनी केलेल्या 'वैध' आधार आणि पासपोर्ट यांचा त्यासाठी विचार व्हावा, अशा सूचनांसह अन्य देशांमधील नागरिकत्व निश्चितीच्या पद्धतींचा अवश्य विचार करून संसदेत सोपा व सुस्पष्ट कायदा गरजेचा आहे. 'वुई दि पीपल ऑफ इंडिया...' हे घटनेच्या प्रास्ताविकेतील वाक्य सार्थ ठरविण्यासाठी तरी ते आवश्यक आहे.

# समोसे विक्रेता अभिनेता आज साडेबारा हजार कोटींचा मालक

**पदार्पण करताच झाला लोकप्रिय; पहिल्याच चित्रपटातून सर्वदूर प्रसिद्धी**



**ग्लोबल महातेज वृत्तसेवा**

बॉलिवूडमध्ये यश मिळविण्यासाठी केवळ नशीबच नव्हे; तर अथक मेहनत आणि चिकाटीही तितकीच महत्त्वाची असते. याचे जीवंत उदाहरण म्हणजे बॉलिवूडचा 'किंग खान' म्हणून ओळखला जाणारा शाहरुख खान. आज जगभरात लोकप्रिय असलेला हा सुपरस्टार एकेकाळी दिल्लीतील नॅशनल स्कूल ऑफ ड्रामा (एनएसडी) च्या कॅन्टीनमध्ये समोसे पोहोचविण्याचे काम करत होता, असा खुलासा ज्येष्ठ अभिनेते पंकज कपूर यांनी केला आहे.

अलीकडेच एका यूट्यूब मुलाखतीदरम्यान कपूर यांनी त्यांच्या आयुष्यातील अनेक आठवणींना उजाळा दिला. यावेळी त्यांनी 'एनएसडी'मध्ये घालवलेले दिवस आठवत एक खास किस्सा सांगितला. त्यांनी सांगितले, की १९७० च्या दशकात ते 'एनएसडी'मध्ये शिक्षण घेत होते. त्यावेळी एक लहान मुलगा वारंवार कॅन्टीनमध्ये समोसे घेऊन येत असे. तो मुलगा म्हणजे पुढे जाऊन बॉलिवूडचा बादशाह ठरलेला शाहरुख खान होता.कपूर यांच्या मते शाहरुखचे वडील किंवा त्यांच्या कुटुंबातील सदस्य 'एनएसडी'च्या कॅन्टीन आणि मेसच्या व्यवस्थापनाशी संबंधित होते. त्यामुळे शाहरुख लहानपणी अनेकदा त्या परिसरात दिसायचा. मात्र, त्यावेळी कुणालाही कल्पना नव्हती की हा साधासुधा मुलगा भविष्यात भारतीय चित्रपटसृष्टीवर अधिराज्य गाजवेल.

**'एनएसडी'शी शाहरुख खानचे खास नाते**

शाहरुख खानचा 'एनएसडी'शी संबंध खूप जुना आहे. त्यांचे वडील मीर ताज मोहम्मद खान दिल्लीमध्ये 'खातिर' नावाचे रेस्टॉरंट चालवत होते. शाहरुखनेही अनेक मुलाखतींमध्ये सांगितले आहे, की त्यांचे वडील 'एनएसडी'च्या मेस आणि कॅन्टीनशी संबंधित कामांमध्ये सहभागी होते. त्यामुळे लहानपणापासूनच शाहरुखचा रंगभूमी आणि अभिनयाच्या वातावरणाशी जवळचा संबंध आला. 'एनएसडी'मधून अनेक दिग्गज कलाकार घडले आहेत. त्यामध्ये अनेक कलाकारांचा समावेश आहे. या कलाकारांच्या कामातून प्रेरणा घेत शाहरुखने अभिनयाचे धडे आत्मसात केले.

**आज १२,४९० कोटींच्या संपत्तीचा मालक**

शाहरुख खानने १९९२ मध्ये प्रदर्शित झालेल्या 'दीवाना' या चित्रपटातून बॉलिवूडमध्ये पदार्पण केले. या चित्रपटात ऋषी कपूर मुख्य भूमिकेत होते. मात्र, नवोदित कलाकार असूनही शाहरुखने आपल्या अभिनयाने प्रेक्षकांचे लक्ष वेधून घेतले आणि पहिल्याच चित्रपटातून स्वतःची वेगळी ओळख निर्माण केली. एकेकाळी कॅन्टीनमध्ये समोसे पोहोचविणारा शाहरुख खान आज जगातील सर्वांत श्रीमंत अभिनेत्यांपैकी एक मानला जातो. विविध माध्यमांमध्ये प्रसिद्ध झालेल्या अहवालांनुसार त्यांची एकूण संपत्ती सुमारे १२,४९० कोटी रुपये इतकी आहे.

# रंजाणे, मुडीतील दोन तरुण बेपत्ता; पोलिसांत तक्रारी दाखल

**ग्लोबल महातेज वृत्तसेवा**

अमळनेर : तालुक्यातील रंजाणे व मुडी येथील दोन तरुण बेपत्ता झाले आहेत. या घटनेबाबत संबंधित कुटुंबीयांनी पोलिसांत तक्रारी दाखल केल्या आहेत. याबाबत पोलिसांच्या सांगण्यानुसार रंजाणे येथील राकेश दशरथ भिल (वय २०) हा दि. २१ जून रोजी सेंट्रिंगच्या कामासाठी जात असल्याचे सांगून घराबाहेर पडला होता. मात्र, रात्री उशिरापर्यंत तो घरी परतला नाही. नातेवाईक व परिचितांकडे चौकशी करूनही त्याचा कोणताही ठावठिकाणा लागला नसल्याने त्याचे वडील दशरथ भिल यांनी मारवड पोलिस ठाण्यात बेपत्ता झाल्याची तक्रार दाखल केली आहे. या घटनेचा सहाय्यक फौजदार संजय पाटील तपास करीत आहेत. दुसऱ्या घटनेत मुडी येथील हिरालाल विठ्ठल भिल (वय ३३) हे दि. १७ जून रोजी सायंकाळी ६ वाजेच्या सुमारास कोणालाही न सांगता घरातून निघून गेले. त्यानंतर आजपर्यंत त्यांचा कोणताही शोध लागलेला नाही. त्यामुळे त्यांच्या पत्नीने पोलिसांत हरविल्याची फिर्याद दाखल केली आहे. या प्रकरणाचा हवालदार प्रवीण पारधी तपास करीत आहेत.



*अमळनेर : शहर व तालुक्यातील चर्मकार समाजबांधवांची येथील शिवाजी उद्यानात शनिवार, दि. २७ जून रोजी बैठक झाली. यावेळी उपस्थित राष्ट्रीय चर्मकार महासंघाचे राष्ट्रीय कार्याध्यक्ष आप्पासाहेब भानुदास विसावे, राष्ट्रीय प्रवक्ते अण्णासाहेब पांडुरंग बाविस्कर, धरणगावच्या नगरसेविका सौ. अंजलीताई विसावे यांच्यासह अमळनेर शहर व तालुक्यातील कार्यकारिणी सदस्य*

# राष्ट्रीय चर्मकार महासंघातर्फे ३० जूनला मुंबईत आंदोलन

## अमळनेरच्या बैठकीत समाजबांधवांना मोठ्या संख्येने उपस्थितीचे आवाहन

**ग्लोबल महातेज वृत्तसेवा**

अमळनेर : शहर व तालुक्यातील चर्मकार समाजबांधवांची येथील शिवाजी उद्यानात शनिवार, दि. २७ जून रोजी बैठक झाली. बैठकीस राष्ट्रीय चर्मकार महासंघाचे राष्ट्रीय कार्याध्यक्ष आप्पासाहेब भानुदास विसावे, राष्ट्रीय प्रवक्ते अण्णासाहेब पांडुरंग बाविस्कर, धरणगावच्या नगरसेविका सौ. अंजलीताई विसावे यांच्यासह अमळनेर शहर व तालुक्यातील कार्यकारिणी सदस्य आणि शहर व तालुक्यातील समाजबांधव उपस्थित होते. याप्रसंगी चर्मकार समाजाच्या उपवर्गीकरणाला विरोध म्हणून मंगळवार, दि. ३० जून २०२६ रोजी मुंबई येथे राज्यव्यापी आंदोलन छेडले जाणार आहे. त्यात समाजबांधवांनी मोठ्या संख्येने सहभागी होण्याचे आवाहन आप्पासाहेब विसावे व अण्णासाहेब बाविस्कर यांनी उपस्थितांना केले. विजय बिऱ्हाडे यांनी प्रास्ताविक व सूत्रसंचालन केले.

# लेकी असाव्या तर अशा..!

पान १ वरून

डोनर शोधण्याचे आव्हान होते. हा कुटुंबासाठी खूप कठीण काळ होता.वडिलांना वाचविण्याची मुलींनी घेतली शपथ  या कठीण काळात जयंत त्यागी यांच्या दोन मुली कुटुंबाची सर्वांत मोठी ताकद बनून पुढे आल्या. नुकतेच बी.टेक पूर्ण केलेल्या २२ वर्षीय ऋषिका त्यागीने कोणताही विचार न करता आपल्या वडिलांना आपली एक किडनी दान करण्याचा निर्णय घेतला. तर १९ वर्षीय बी. टेकच्या पहिल्या वर्षात शिकणाऱ्या खुशी त्यागीनेही आपल्या वडिलांना लिव्हरचा काही भाग दान करण्याची इच्छा व्यक्त केली. जेव्हा कुटुंबाने मुलींना त्यांच्या निर्णयावर पुनर्विचार करण्यास सांगितले, तेव्हा त्यांची प्रतिक्रिया अत्यंत भावनिक होती. जर वडील नसतील तर सर्व काही निरर्थक आहे असं या मुलींनी स्पष्टपणे सांगितले. त्याशिवाय जर त्यांच्या आईने अवयवदान केले आणि तिच्या आरोग्यावर परिणाम झाला, तर संपूर्ण कुटुंबाची काळजी कोण घेणार? या मुलींच्या भावनेने कुटुंबालाही गहिवरून आले. चाचण्यांनंतर मुली योग्य डोनर ठरल्या जयंत त्यागी यांच्या उपचारावेळी डॉक्टरांनी कुटुंबातील अनेक सदस्यांच्या वैद्यकीय चाचण्या केल्या. प्रत्यारोपणासाठी सर्वात योग्य डोनर ओळखणे हा यामागील उद्देश होता. सर्व चाचण्या आणि वैद्यकीय प्रक्रिया पूर्ण झाल्यावर ऋषिका आणि खुशी दोघीही त्यांच्या वडिलांसाठी सर्वात योग्य डोनर असल्याचे स्पष्ट झाले. यानंतर सखोल समुपदेशन, कायदेशीर औपचारिकता आणि वैद्यकीय मंजुरी पूर्ण करण्यात आल्या. हा कुटुंबासाठी मानसिकदृष्ट्या आव्हानात्मक काळ होता, परंतु दोन्ही मुली आपल्या निर्णयावर ठाम राहिल्या. नोएडाच्या रुग्णालयात प्रत्यारोपण यशस्वी सर्व तयारीनंतर विशेषज्ञ डॉक्टरांच्या टीमने नोएडाच्या एका खासगी रुग्णालयात ही गुंतागुंतीची प्रत्यारोपण शस्त्रक्रिया पार पाडली. ही शस्त्रक्रिया अनेक तास चालली आणि त्यात एकाच वेळी किडनी आणि लिव्हर प्रत्यारोपणाचा समावेश होता. ही शस्त्रक्रिया पूर्णपणे यशस्वी झाली. सध्या जयंत त्यागी आणि त्यांची धाकटी मुलगी खुशी आयसीयूमध्ये देखरेखीखाली आहेत तर ऋषिकाची प्रकृती स्थिर असल्याचे डॉक्टरांनी सांगितले. सर्वजण बरे होत असून दोन्ही मुलींना लवकरच रुग्णालयातून घरी सोडण्यात येईल, असा विश्वास डॉक्टरांनी व्यक्त केला.

# छत्रपती शिवाजी महाराजांचा इतिहास दोन राष्ट्रांना जोडणार!

## 'या' देशात शिवरायांचा भव्य पुतळा उभारणार; शौर्याचा जागतिक सन्मान



**ग्लोबल महातेज वृत्तसेवा**

इस्रायलमध्ये छत्रपती शिवाजी महाराजांचा भव्य पुतळा उभारला जाणार आहे. महाराजांचा वारसा आता इस्रायलमध्ये दिसून येणार आहे. ६ जून २०२६ रोजी भारतात १६७४ मधील छत्रपती शिवाजी महाराजांच्या राज्याभिषेकाच्या स्मरणार्थ शिवराज्याभिषेक दिन साजरा केला जात असताना एका अनपेक्षित ठिकाणाहून एक महत्त्वपूर्ण घोषणा करण्यात आली. इस्रायलचे मुंबईतील महावाणिज्यदूत यानव रेवाच यांनी जाहीर केले की, इस्रायल आपल्या प्रमुख शहरांपैकी एका शहरात छत्रपती शिवाजी महाराजांचा भव्य पुतळा उभारण्याची योजना आखत आहे. भारत आणि इस्रायलच्या जनतेला अधिक जवळ आणण्यासाठी हा एक दीर्घकालीन उपक्रम असल्याचे त्यांनी सांगितले.

त्यांच्या मते पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या ऐतिहासिक जेरुसलेम दौऱ्यानंतर दोन्ही देशांनी द्विपक्षीय संबंध अधिक बळकट करण्यासाठी नव्या मार्गांचा शोध घेण्यास सुरूवात केली आणि त्यातूनच या प्रस्तावाचा जन्म झाला. महाराष्ट्राचे मुख्यमंत्री ना. देवेंद्र फडणवीस यांनी या घोषणेचे स्वागत करत राज्य सरकारतर्फे ऐतिहासिक संदर्भ, कलात्मक मार्गदर्शन आणि रचनात्मक सहाय्य देण्याचे आश्वासन दिले. भारत–इस्रायल संबंधांचा जवळून अभ्यास करणाऱ्यांसाठी ही घटना पूर्णपणे अनपेक्षित नव्हती. मात्र तिचे महत्त्व केवळ राजनैतिक संबंधांपुरते मर्यादित नाही. ती एका व्यापक सांस्कृतिक आणि नागरीकरणात्मक जाणिवेचे प्रतीक आहे. निरपराधांचे संरक्षण करणारे आणि अत्याचाराविरुद्ध उभे राहणारे धैर्य हे सीमांच्या आणि शतकांच्या पलीकडेही स्मरणात राहिले पाहिजे, या विश्वासाचे. यामुळे एक महत्त्वाचा प्रश्न निर्माण होतो. इस्रायलसारख्या राष्ट्रासाठी, ज्याने नैतिक धैर्याचा सन्मान आपल्या राष्ट्रीय ओळखीचा आधारस्तंभ बनवला आहे, छत्रपती शिवाजी महाराजांना त्या परंपरेत स्थान देण्याचा अर्थ काय आहे?

ही घोषणा इतकी महत्त्वाची का आहे, हे समजून घेण्यासाठी इस्रायलची वीरांचा सन्मान करण्याची परंपरा समजून घेणे आवश्यक आहे. या परंपरेच्या केंद्रस्थानी आहे याद वाशेम जेरुसलेममधील इस्रायलचे राष्ट्रीय होलोकॉस्ट स्मारक. १९५३ मध्ये इस्रायली संसद क्नेसेटने स्थापन केलेली ही संस्था नाझी राजवटीत मृत्युमुखी पडलेल्या सुमारे ६० लाख ज्यूंच्या स्मृती जपण्यासाठी आणि होलोकॉस्ट काळात स्वतःचा जीव धोक्यात घालून ज्यू नागरिकांचे प्राण वाचवणाऱ्यांचा गौरव करण्यासाठी उभारण्यात आली. 'रायटस अमंग द नेशन्स' हा इस्रायलचा सर्वोच्च नागरी सन्मान अशा व्यक्तींना दिला जातो. या सन्मानांतर्गत पदक, प्रमाणपत्र आणि याद वाशेममधील 'वॉल ऑफ ऑनर'वर नाव कोरण्याचा मान दिला जातो. या परंपरेतील व्यक्तिमत्त्वे जगभरातून आली आहेत. जर्मन उद्योगपती ऑस्कर शिंडलर यांनी स्वतःची संपत्ती खर्च करून १,२०० हून अधिक ज्यू कामगारांचे प्राण वाचवले. स्वीडिश मुत्सद्दी राऊल वॉलेनबर्ग यांनी बुडापेस्टमध्ये एक लाखांहून अधिक लोकांचे संरक्षण केले. आयरेना सेंडलर यांनी सुमारे २,५०० ज्यू मुलांना वॉर्सा घेट्टोमधून सुरक्षित बाहेर काढले. जपानी मुत्सद्दी चिऊने सुगिहारा यांनी स्वतःच्या सरकारच्या आदेशांकडे दुर्लक्ष करून हजारो जीवनरक्षक व्हिसा जारी केले.

याद वाशेममधील 'अ‍ॅव्हेन्यू ऑफ द रायटस'मध्ये ४४ हून अधिक देशांतील अशा व्यक्तींच्या स्मृतिफलकांचे जतन करण्यात आले आहे. हे केवळ इतिहासातील उल्लेख नाहीत; ते इस्रायलच्या नैतिक दिशादर्शकाचे प्रतीक आहेत. याच पार्श्वभूमीवर इस्रायलचा छत्रपती शिवाजी महाराजांना सन्मान देण्याचा निर्णय समजून घेतला पाहिजे. हा केवळ प्रतीकात्मक राजनैतिक उपक्रम नाही; त्यामागे एक सखोल ऐतिहासिक तर्क आहे. काही इतिहासकारांनी छत्रपती शिवाजी महाराजांची तुलना ज्यू इतिहासातील महत्त्वपूर्ण व्यक्तिमत्त्व ज्युदास मॅकॅबियस यांच्याशी केली आहे. मॅकॅबियस यांनी सेल्युसिड शासक अँटिओकस चतुर्थ एपिफेन्स याच्या विरोधात संघर्ष करून ज्यू धार्मिक परंपरांचे संरक्षण केले. त्याचप्रमाणे, छत्रपती शिवाजी महाराजांनी औरंगजेबाच्या काळातील मुघल विस्ताराला प्रतिकार करत आपल्या राज्यातील बहुविध आणि सर्वसमावेशक स्वरूपाचे रक्षण केले. ते केवळ पराक्रमी सेनानी नव्हते. ते संस्थांचे निर्माते, सामान्य जनतेचे रक्षक आणि धार्मिक सहअस्तित्वाचे समर्थक होते. हे सर्व त्यांनी अशा काळात केले, जेव्हा अशा मूल्यांचे पालन करणे सोपे नव्हते. विशेष म्हणजे त्यांनी आपल्या राज्यातील सर्व धर्मीयांना संरक्षण दिले, ज्यामध्ये महाराष्ट्रातील ज्यू समुदायाचाही समावेश होता. महाराष्ट्रात शतकानुशतके शांततेने वास्तव्य करणाऱ्या बेने इस्राएल समुदायाने आपली धार्मिक ओळख जपत मराठी भाषा आणि स्थानिक संस्कृती आत्मसात केली होती. ऐतिहासिक नोंदीनुसार, या समुदायातील काही सदस्यांनी १७व्या शतकात छत्रपती शिवाजी महाराजांच्या सैन्यातही सेवा बजावली. हा केवळ योगायोग नाही; ही दोन संस्कृतींच्या मूल्यांची नैसर्गिक सांगड आहे. महावाणिज्यदूत रेवाच यांनी मुख्यमंत्री फडणवीस यांना लिहिलेल्या पत्रात नमूद केले, की इस्रायलमधील छत्रपती शिवाजी महाराजांचा पुतळा विशेष महत्त्वाचा ठरेल, कारण महाराष्ट्र आणि भारतीय ज्यू समुदाय यांच्यातील ऐतिहासिक संबंध अत्यंत गहिरे आहेत. या समुदायातील अनेक वंशज आज इस्रायली समाजात महत्त्वपूर्ण योगदान देत आहेत. छत्रपती शिवाजी महाराजांचा गौरव भारताच्या सीमांबाहेर होणे ही नवी गोष्ट नाही. मॉरिशस, अमेरिका आणि जपानमध्ये त्यांच्या स्मरणार्थ पुतळे उभारण्यात आले आहेत. मात्र इस्रायलचा उपक्रम वेगळा आहे. भारतीय वंशाच्या समुदायाच्या पुढाकाराविना, एखाद्या सार्वभौम राष्ट्राने छत्रपती शिवाजी महाराजांना धैर्य आणि अन्यायाविरुद्धच्या प्रतिकाराचे जागतिक प्रतीक म्हणून सन्मानित करण्याचा हा पहिलाच प्रसंग ठरू शकतो. या प्रस्तावाद्वारे इस्रायल होलोकॉस्टच्या स्मरणापुरतीच आपली परंपरा मर्यादित ठेवत नाही, तर अन्यायाविरुद्ध लढणारे धैर्य कोणत्याही एका काळाचे किंवा भौगोलिक प्रदेशाचे मक्तेदारी नसते, हेही अधोरेखित करते.

पुतळ्याव्यतिरिक्त, इस्रायलने छत्रपती शिवाजी महाराजांवरील साहित्याचे हिब्रू भाषेत भाषांतर करण्याची इच्छाही व्यक्त केली आहे, जेणेकरून इस्रायली नागरिकांनात्यांच्या इतिहास, प्रशासन आणि तत्त्वज्ञानाचा थेट परिचय होईल. भारतातील लोकांसाठी हा केवळ अभिमानाचा क्षण नसून एक जबाबदारीही आहे. शतकानुशतके जुना, सांस्कृतिकदृष्ट्या समृद्ध आणि अजूनही मुख्य प्रवाहातील भारतीय समाजाला पुरेसा परिचित नसलेला बेने इस्राएल समुदायाचा इतिहास शाळांमध्ये शिकवला गेला पाहिजे, संस्थात्मक स्तरावर जतन केला गेला पाहिजे आणि दोन्ही देशांत साजरा केला गेला पाहिजे.

छत्रपती शिवाजी महाराजांनी जपलेली मूल्ये दुबळ्यांचे संरक्षण, हिंसक अतिरेकाचा प्रतिकार आणि न्यायाधिष्ठित शासन ही १७व्या शतकातील केवळ ऐतिहासिक स्मृती नाहीत. ती आजही जिवंत असलेली परंपरा आहे. जेव्हा स्मरणसंस्कृतीवर आपली नैतिक ओळख उभारलेल्या इस्रायलसारख्या राष्ट्राने या वारशाचा सन्मान करण्याचा निर्णय घेतला आहे, तेव्हा भारतानेही त्या भावनेला तितक्याच गांभीर्याने प्रतिसाद दिला पाहिजे. वेगवेगळ्या भूमी. वेगवेगळी शतके. पण एकच सामायिक विश्वास धैर्य जिथे कुठे दिसेल, ते कधीही विसरले जाऊ नये. वरुण सिंग हे मुंबईस्थित वरिष्ठ पत्रकार असून ते समुदाय, राजकारण आणि रिअल इस्टेट या विषयांवर लेखन करतात. त्यांनी राजकारण विषयात एम.ए., एलएलबी तसेच पत्रकारितेची पदवी प्राप्त केली आहे.

हे वृत्तपत्र मुद्रक, प्रकाशक व मालक श्री. आनंद डिगंबर महाले यांनी महातेज पब्लिकेशनसाठी अविष्कार ग्राफिक्स, प्लॉट नं. 17, रामचंद्र नगर, भुसावळ रोड, जळगाव (महाराष्ट्र) 425002 येथे छापून गट नं. 160, प्लॉट नं. 51/52, सुप्रभा अपार्टमेंट, मराठा मंगल कार्यालयाजवळ, पटवारी कॉलनी, अमळनेर, जि. जळगाव (महाराष्ट्र) 425401 येथे प्रसिद्ध केले. संपादक :– आनंद डिगंबर महाले (रजि नं. MAHBIL/25/A0192), कार्यकारी संपादक श्री. भरत रघुनाथ पाटील ( पी. आर. बी. कायद्यानुसार संपादकीय जबाबदारी यांची राहील.) या अंकात प्रसिद्ध झालेल्या बातम्या व लेख यातून व्यक्त झालेल्या मतांशी संपादक व कार्यकारी संपादक सहमत असतीलच असे नाही. महातेज पब्लिकेशन तथा ग्लोबल महातेज संबंधित कोणतेही वाद तथा खटले फक्त अमळनेर न्यायालयातच चालविले जातील. संपर्क : 7711004040, 7711004242, ई–मेल : globalmahatej@gmail.com



# ओला, उबेर आणि रॅपिडो यांच्यात काय आहे फरक?

## प्रवासासाठी वापरत असाल तर त्यांचे नियम समजावून घेणे आवश्यक

**ग्लोबल महातेज वृत्तसेवा**

तुम्ही जर प्रवासासाठी ओला, उबेर आणि रॅपिडो वापरत असाल, तर हे पुढचे एक्स्प्लेनर तुमच्यासाठी अत्यंत महत्त्वाचे आहे. कारण ओला, उबेर आणि रॅपिडो सर्रास नियमांचे उल्लंघन करत आहेत. काय आहेत त्यांचे नियम, काय आला एका प्रवाशाला त्यांचा अनुभव हे नेमके समजावून घेणे आवश्यक आहे.

बऱ्याच वेळा तुम्हाला एक अनुभव आला असेल, की तुम्ही जेव्हा ओला, उबेर किंवा रॅपिडो बुक करता तेव्हा तुम्हाला त्या गाडीच्या किंवा रिक्षाच्या नंबरचा मेसेज येतो. पण प्रत्यक्षात मात्र वेगळ्याच नंबरची रिक्षा किंवा गाडी आलेली असते.


उदाहरण १ : मुंबईच्या कुर्ला स्थानक परिसरातून रॅपिडो ॲपवर एका प्रवाशाने एक रिक्षा बुक केली. यामध्ये रिक्षाचा नंबर होता एमएच ०३ बीवाय २९३८. हा नंबर त्यांना दाखविण्यात आला. मात्र प्रत्यक्षात त्यांच्या प्रतिनिधीला घ्यायला आलेल्या रिक्षाचा नंबर होता एमएच ०३ डीएस १८२२. म्हणजे दोन्ही नंबर वेगळे होते.

**चालक आणि ग्राहक संवाद**

**ग्राहक :** ॲपवर वेगळा नंबर आणि गाडीचा नंबर वेगळा, असे कसे?

**चालक :** मॅडम, काही हरकत नाही, आयडी माझीच चालते. दुसऱ्याची आयडी नाही. मोहम्मद गुलाम नावाने आयडी आहे. आम्ही भाड्याने गाड्या चालवतो. त्यामुळे गाड्या बदलत राहतात. रॅपिडोमध्ये हे चालते, उबेरमध्ये चालत नाही.

**नियम उल्लंघन :** ओला, उबेर किंवा रॅपिडोमध्ये फक्त नंबरचाच घोटाळा नाही, तर




असे अनेक घोटाळे चालतात. त्यापैकी दुसरा घोटाळा म्हणजे ओला-उबेर व्यावसायिक फक्त महाराष्ट्रातील नंबरच्या गाड्या बुक करू शकतात. मात्र, मेसेज पाठविताना त्यांनी महाराष्ट्राच्या गाडीचा नंबर (एमएच २० ३३) पाठवला, पण प्रत्यक्षात गाडी आली ती उत्तर प्रदेशची (यूपी). याबाबत आता 'मनसे'नेही आवाज उठविण्याचे ठरवले आहे.

**'मनसे' नेत्याचे म्हणणे :** 'महाराष्ट्रामध्ये यूपी पासिंग झालेल्या गाड्या टॅक्सी सेवा देऊ शकत नाहीत. तरीही या गाड्या राजरोसपणे फिरत आहेत. यूपी, हरियाणा येथील ड्रायव्हर तेथील लायसन्सवर येथे गाड्या चालवत आहेत.'

**उदाहरण २ :** रॅपिडोवर आम्ही एक गाडी बुक केली- ड्रायव्हर मोहन यादव आणि गाडीचा नंबर एमएच ०५ ईएल ३७४५. मात्र, बुक झाल्यानंतर लगेचच ड्रायव्हरने मेसेज केला की तो दुसऱ्या क्रमांकाची गाडी घेऊन येत आहे. एका घटनेत तर ड्रायव्हर चक्क माफी मागताना दिसला.

**ड्रायव्हरची माफी :** 'मॅडम, माझी चूक झाली, तुम्हाला हवे तर तुम्ही मला मारू शकता, मी रडून तुमची माफी मागतो.'

**गंभीर प्रश्न :** या सगळ्यामुळे सुरक्षेचा मोठा प्रश्न निर्माण होतो. तुम्ही जेव्हा गाडी बुक करता तेव्हा कंपनीकडे एक नंबर नोंदविलेला असतो. मात्र, गाडी भलत्याच नंबरची येते. समजा प्रवासामध्ये काही दुर्घटना घडली किंवा काही विपरीत घडले, तर कंपनी 'आम्ही ही गाडी पाठवलीच नव्हती' असे सांगून हात झटकू शकते. मग तुमच्या सुरक्षेची जबाबदारी कोणाची?

**भ्रष्टाचाराचा आरोप :** या कंपन्यांची मनमानी सुरू असण्याचे कारण 'आरटीओ'मधील भ्रष्टाचार असल्याचे सांगितले जात आहे. रिक्षाचालकांच्या मते १५-२० किंवा ५० रुपये देऊन 'आरटीओ'कडून गाड्या सोडवून घेतल्या जातात.

**निष्कर्ष :** पुढच्या वेळी ओला, उबेर किंवा रॅपिडोमध्ये बसताना ॲपवर आलेला नंबर आणि प्रत्यक्षात आलेली गाडी यांचा नंबर सारखाच आहे का, याची खातरजमा करा आणि मगच प्रवासाला सुरूवात करा. तुमची सुरक्षा तुमच्याच हातात आहे.

# तांदूळ शिजवण्यापूर्वी धुणे खरोखर गरजेचे आहे का?



**ग्लोबल महातेज वृत्तसेवा**

बहुतेक घरांमध्ये तांदूळ शिजवण्यापूर्वी दोन ते तीन वेळा धुतले जातात. यामुळे अतिरिक्त स्टार्च आणि धूळ निघून जाते असे मानले जाते.

**तांदूळ धुतल्याने काय होते?**

तांदळाच्या पृष्ठभागावरील अतिरिक्त स्टार्च कमी होऊ शकतो, त्यामुळे भात कमी चिकट होण्यास मदत मिळते. काही संशोधनांनुसार तांदूळ धुतल्याने त्यातील बॅक्टेरिया पूर्णपणे नष्ट होत नाहीत. मात्र धूळ, माती आणि काही अशुद्धता कमी होऊ शकतात.

**पोषक तत्त्वांचे नुकसान होऊ शकते**

वारंवार धुतल्यास काही पाण्यात विरघळणारी जीवनसत्त्वे आणि खनिजे कमी होण्याची शक्यता असते, विशेषतः फोर्टिफाइड तांदळामध्ये.

**धुणे टाळावे का?**

तांदूळ पूर्णपणे न धुता वापरण्याचा सल्ला बहुतेक तज्ज्ञ देत नाहीत. स्वच्छतेसाठी एक-दोन वेळा धुणे योग्य मानले जाते.

भाताच्या प्रकारावर अवलंबून बासमती, ब्राऊन राईस किंवा फोर्टिफाइड तांदूळ यांसाठी धुण्याची पद्धत वेगवेगळी असू शकते.

**अतिरिक्त स्टार्च कमी करण्यासाठी उपयुक्त**

मोकळा आणि दाणेदार भात हवा असल्यास तांदूळ धुणे फायदेशीर ठरू शकते.

**स्वच्छता आणि पोषण यांचा समतोल महत्त्वाचा**

तांदूळ धुताना अति धुणे टाळा. यामुळे स्वच्छताही राखली जाते आणि पोषक तत्त्वांचे नुकसानही कमी होते.

**योग्य पद्धत कोणती?**

तांदूळ एक-दोन वेळा हलक्या हाताने धुवा. खूप वेळ भिजवून ठेवणे किंवा वारंवार धुणे टाळा.

# झीरो फिगरपासून फिट बॉडीपर्यंत...

## करिना कपूरच्या फिटनेसचे खास रहस्य आले समोर

**ग्लोबल महातेज वृत्तसेवा**

योगातज्ज्ञ रूपल सिध यांनी दावा केला आहे, की तिच्या मार्गदर्शनात अभिनेत्री करिनाने ५० पासून हळूहळू वाढवत १०८ सूर्यनमस्कार घातले होते, ज्यामुळे करिनाला खूप फायदा झाला. पण प्रश्न असा आहे, की एका दिवसात १०८ सूर्यनमस्कार घालणे सुरक्षित आहे का?

बॉलीवूड अभिनेत्री करिना कपूर खान ही अभिनयासह तिच्या फिटनेस आणि चमकदार त्वचेसाठी ओळखली जाते. तिच्या सौंदर्याचे लाखो चाहते आहेत. नुकतेच करिनाच्या योगा प्रशिक्षक, योगातज्ज्ञ रूपल सिध यांनी खुलासा केला, की ती स्वतःला फिट ठेवण्यासाठी रोज ३० ते १०८ सूर्यनमस्कार घालते. योगातज्ज्ञ रूपल सिध यांनी स्पष्ट केले, की वजन कमी करण्यासाठी सूर्यनमस्कार अत्यंत प्रभावी आहे. प्रत्येक आठवड्याला सूर्यनमस्कार घालण्याची संख्या हळूहळू ३०-६०-९० आणि मग १०९ पर्यंत वाढूव शकता.

योगातज्ज्ञ रूपल सिध यांनी दावा केला, की तिच्या मार्गदर्शनात अभिनेत्री करिनाने ५० पासून हळूहळू वाढवत १०८ सूर्यनमस्कार घातले होते. ज्यामुळे करिनाला खूप फायदा झाला. पण प्रश्न असा आहे, की एका दिवसात १०८ सूर्यनमस्कार घालणे सुरक्षित आहे का? त्यामुळे आरोग्याचे नुकसान होऊ शकते का? तज्ज्ञ आणि योग प्रशिक्षकांचे याबाबत काय मत आहे आणि फिटनेसचा नक्की फॉर्म्युला काय आहे हे जाणून घ्या.

### फिट राहण्यासाठी दिनक्रम कसा असावा?

तज्ज्ञांनी इन्स्टाग्राम व्हिडिओमध्ये स्पष्ट केले, की वजन कमी करण्यासाठी रोज १० हजार पावले चालावे. दिवसभर ६ वेळा थोडा-थोडा आहार घ्यावा, वेट ट्रेनिंगमुळे स्नायू मजबूत करावे आणि दिवसभरात कमीत कमी ३ लीटर पाणी पिणे अत्यंत आवश्यक आहे. तज्ज्ञांच्या मते जर तुम्हाला तुमच्या शरीरातील चरबी कमी करायची असेल, तर सकाळी हेल्दी फॅट्सचे सेवन करा. रोज ४५ मिनिटे योगा आणि व्यायाम करा. रोज जेवल्यानंतर चालायला जा. तंदुरुस्त राहण्यासाठी योग्य आहार आणि ८ तासांची झोप पूर्ण करणे आवश्यक आहे.

### १०८ सूर्यनमस्कार घालणे सर्वांसाठी शक्य आहे का?

कन्सल्टेंट डाइटीशिअन आणि फिटनेस एक्स्पर्ट गरिमा गोयल यांच्या मतानुसार 'सूर्यनमस्कार हा एक संपूर्ण शरीराचा व्यायाम आहे. ज्यामुळे ताकद, लवचिकता, संतुलन आणि हृदयाचे आरोग्य सुधारते.' तथापि, दररोज १०८ सूर्यनमस्कार करणे ही गरज नसून, ते एक शारीरिक आणि मानसिक आव्हान आहे. त्यांनी सांगितले, की सूर्यनमस्कारांची संख्या सावधगिरीने वाढविली पाहिजे. ज्याप्रमाणे स्ट्रेंथ ट्रेनिंग शरीराला हा ताकदीचा व्यायाम करण्यासाठी वेळ देतो, त्याचप्रमाणे ३० ते ६०, नंतर ९० आणि शेवटी १०८ सूर्यनमस्कार केल्याने स्नायूंची ताकद, सहनशक्ती आणि हृदयाचे आरोग्य सुधारू शकते. यामुळे दुखापतीचा धोकाही कमी होतो.

### घाई केल्यास समस्या निर्माण होऊ शकतात



गरिमा गोयल यांनी स्पष्ट केले, की सूर्यनमस्कारांची संख्या वाढविणे हे व्यक्तीची शारीरिक क्षमता, वय, लवकर सावरण्याची क्षमता आणि योग्य तंत्रावर अवलंबून असते. जे लोक आरामात २०-३० सूर्यनमस्कार करू शकतात, ते दर आठवड्याला काही फेऱ्या वाढवू शकतात. तथापि, नवशिक्यांसाठी, अचानक खूप जास्त सूर्यनमस्कार केल्याने मनगट, खांदा आणि पाठदुखी किंवा अतिरिक्त थकवा येऊ शकतो.

एका सूर्यनमस्कारादरम्यान खांदे, छाती, पाठ, पोट, नितंब आणि पाय यांसारख्या शरीराच्या अनेक भागांतील स्नायू सक्रिय होतात. त्यामुळे १०० पेक्षा जास्त वेळा त्याची पुनरावृत्ती केल्याने शरीरावर खूप ताण येतो. ज्यामुळे पुरेशी विश्रांती घेणे आवश्यक ठरते.

### सातत्यता आवश्यक आहे का?

गरिमा गोयल म्हणतात, की फिटनेसचे ध्येय केवळ संख्या पूर्ण करणे नाही. संशोधनातून असे दिसून आले आहे, की जास्त पुनरावृत्तीपेक्षा योग्य तंत्र आणि नियमित सराव अधिक फायदेशीर ठरतो. अनेक लोकांसाठी १२ ते २४ तास नियमितपणे सूर्यनमस्कार केल्याने लक्षणीय फायदे मिळू शकतात.

१०८ पर्यंत सूर्यनमस्कार करण्याचा फॉर्म्युला, आठवडे १-२ : २४ ते ३० सूर्यनमस्कार, आठवडे ३-४ : ४० ते ५० सूर्यनमस्कार, आठवडे ५-६ : ६० ते ७५ सूर्यनमस्कार. आठवडे ७-८ : ९० किंवा अधिक सूर्यनमस्कार.

यानंतर शरीर पूर्ववत झाल्यास आणि तंत्र योग्य राहिल्यास १०८ सूर्यनमस्कारांचा प्रयत्न केला जाऊ शकतो. तज्ज्ञांच्या मते कोणतेही फिटनेस आव्हान ही एक परीक्षा नसून एक प्रशिक्षण प्रक्रिया असली पाहिजे.

# जिद्द असावी तर अशी !

## निवृत्तीनंतर साताऱ्याच्या माजी सैनिकाने एकाच वर्षात 'क्रॅक' केल्या तब्बल १२ सरकारी परीक्षा

**ग्लोबल महातेज वृत्तसेवा**

सक्सेस स्टोरी

रणदुल्लाबाद (ता. कोरेगाव) येथील माजी सैनिक यशवंत चंद्रकांत जगताप यांनी निवृत्तीनंतर जिद्द, चिकाटीने शासनाच्या सरळ सेवा भरतीच्या तब्बल १२ परीक्षा 'क्रॅक' केल्या आहेत. त्यांच्या या यशाचे सर्व स्तरातून कौतुक होत आहे. सामान्य कुटुंबामध्ये जन्मलेल्या यशवंत जगताप यांचे पहिली ते सातवीपर्यंतचे शिक्षण गावातील जिल्हा परिषद शाळेत झाले. त्यानंतर करंजखोप येथील न्यू इंग्लिश स्कूलमध्ये आठवी ते दहावीपर्यंत शिक्षण घेतले. नंतर घरच्या परिस्थितीमुळे सातारा येथे आयटीआयमध्ये प्रवेश घेतला.

आयटीआय पूर्ण होताच पुणे येथे एका कंपनीमध्ये नोकरी करत करत भारतीय सैन्य दलामध्ये भरती होण्याचा प्रयत्न केला व भरती झाले. जीवनात काही तरी वेगळ करण्याचे स्वप्न होते ते राहून गेले. मात्र, सैन्य दलात भरती झाल्यामुळे प्रामाणिकपणे देशसेवा करायचा निर्णय घेऊन तो तडीस नेला. देशसेवेचा कार्यकाळ पूर्ण झाल्याने नुकतेच ते निवृत्त झाले. त्यांनी पुणे येथे स्पर्धा परीक्षांचे क्लास लावले.

पहिल्या वर्षात शासनाच्या सरळ सेवेच्या जागा निघाल्या व सर्व जागांवर श्री. जगताप यांनी प्रविष्ट होऊन घवघवीत यशही मिळवले. तब्बल १२ परीक्षा त्यांनी क्रॅक केल्या. कुटुंबाची जबाबदारी लक्षात घेऊन आपण आता पुढील अभ्यासक्रम थांबवले, अन्यथा अजून एखाद्या मोठ्या पदावर आपण यश मिळवू शकलो असतो, असा ठाम विश्वास श्री. जगताप यांनी माध्यमांशी बोलताना व्यक्त केला आहे.



**दोन वेळा उत्तीर्ण**

यशवंत जगताप यांनी सहाय्यक सहकारी अधिकारी, कर निर्धारण प्रशासकीय अधिकारी, आयटीआय प्रोफेसर, पुरवठा निरीक्षक, पिंपरी चिंचवड महानगर पालिका लिपिक, फॉरेस्ट अकाउंटट, तलाठी, मंत्रालय लिपिक (दोन वेळा), कर सहाय्यक (दोन वेळा) व कनिष्ठ सहाय्यक (पुणे जिल्हा परिषद) या तब्बल १२ परीक्षांत उज्ज्वल यश मिळविले आहे.









# यंदाची वटपौर्णिमा कधी ?

## जाणून घ्या नेमकी तारीख व पूजेचा शुभ मुहूर्त आणि विधी

**ग्लोबल महातेज वृत्तसेवा**

वटपौर्णिमा हा सण सुवासिनी महिला साजरा करतात. आपल्या पतीच्या दीर्घायुष्यासाठी या दिवशी सुवासिनी निर्जल व्रत करतात. वडाच्या झाडाची पूजा करून वडाला धागा बांधत सात जन्म हाच पती मिळावा अशी प्रार्थना करतात. नवविवाहित महिलांसाठी हा सण विशेष असतो. या दिवशी साजशृंगार करून सुवासिनी वडाची पूजा करतात. यंदा वटपौर्णिमा नेकमी केव्हा आहे याबात थोडा संभ्रम निर्माण झाला आहे. त्यामुळे वटपौर्णिमेची तारीख, पूजेचा शुभमुहूर्त व संपूर्ण पूजाविधी कशी करावी ते जाणून घेऊया.

अखंड सौभाग्याची प्राप्ती व्हावी, यासाठी वटपौर्णिमेचे व्रत केले जाते. या सणाला हिंदू धर्मात अत्यंत महत्वाचे मानले जाते. ज्येष्ठ पौर्णिमेला दरवर्षी वटपौर्णिमा साजरी केली जाते. यादिवशी सुवासिनी स्त्रिया सकाळी लवकर उठून स्नान करतात. देवाची पूजा केल्यानंतर साग्रसंगीत जेवण नैवेद्यासाठी बनवले जाते. त्यानंतर नवविवाहित महिला व सुवासिनी नवीन भरजरी साडी नेसून सजतात. हातात हिरवा चुडा,गळ्यात मंगळसूत्र,केसात गजरा असा सोलाशृंगार करून वडपुजेसाठी सुवासिनी जातात. वडाच्या झाडाची पूजा करून सातजन्म हाच पती मिळावा अशी प्रार्थना करतात. सायंकाळी व्रत सोडतात तर काहीजण दुसऱ्या दिवशी उपवास सोडतात. अशाप्रकारे वटसावित्रीचे हे व्रत अखंड सौभाग्यासाठी महत्त्वाचे मानले जाते.

### वटपौर्णिमा पूजेचा मुहूर्त

हिंदू पंचांगानुसार ज्येष्ठ पौर्णिमा तिथी सोमवार, दि. २९ जून रोजी येत आहे. या दिवशी वटपौर्णिमेच्या पूजेचा शुभ मुहूर्त सकाळी ८.५५ ते सकाळी १०.४० या दरम्यान असेल.

### वटपौर्णिमा तारीख

**ज्येष्ठ पौर्णिमा तिथी प्रारंभ :** रविवार, दि. २८ जून २०२६ सकाळी ८ वाजून ३५ मिनिटांनी.

**ज्येष्ठ पौर्णिमा तिथी समाप्त :** सोमवार, दि. २९ जून २०२६ सकाळी ८ वाजून ४८ मिनिटांनी.

उदय तिथीनुसार ज्येष्ठ पौर्णिमा २९ जून रोजी साजरी करण्यात येईल. त्यामुळे वटपौर्णिमेचा सण हा सोमवार, दि. २९ जून या दिवशी सर्वत्र असेल.

### वटपौर्णिमा पूजा साहित्य

वटपौर्णिमेच्या दिवशी सुवासिनी स्त्रियांनी वाण घेऊन वडाची पूजा करण्यासाठी जावे. पूजेच्या ताटात हळद-कुंकू, वडाला बांधण्यासाठी दोरा, सावित्रीच्या पूजेसाठी बांगड्या, मंगळसूत्र शृंगाराचे सामान, दिवा, पाच फळे, आंब्याला महत्त्व, पाण्याचा तांब्या, कापसाचे सूत, फुले, विड्याची पाने असे सर्व साहित्य घेऊन जावे.

### वटपौर्णिमा पूजा विधी

वडाच्या झाडाची पूजा करताना सर्वप्रथम हळदी-कुंकू वहावे, मग कापसाचे सूत आणि सौभाग्याचे लेणे म्हणजेच बांगड्या मंगळसूत्र सावित्री देवीला अर्पण करावे. विड्याची पाने ठेवावीत, फळे एका बाजूला ठेवावी मग फुले आणि अक्षता वहावीत. ताटात निरंजन घेऊन औक्षण करून ओवाळावे. पतीच्या आरोग्य व दीर्घायुष्य तसेच सुखी संसारासाठी प्रार्थना करावी. त्यांना तांब्यातील पाण्याने वडाळा प्रदक्षिणा घालावी. सर्वात शेवटी धागा बांधून त्या धाग्याने वडाला सात प्रदक्षिणा माराव्यात व सात जन्माची गाठ आपल्या पतीशी कायम बांधली जावी असे मागणे मागावे.



# पैशांची चणचण टाळण्यासाठी ‘या’ ५ गोष्टींचा करू नका गर्व

**ग्लोबल महातेज वृत्तसेवा**

आचार्य चाणक्य यांनी साधिदलेली तत्त्वे आणि विचार शेकडो वर्षांनंतरही तितकेच महत्त्वाचे असून आजही लाखो लोकांना जीवनात योग्य दिशा देत आहेत. त्यांनी या गोष्टींचा ‘चाणक्य नीती’ ग्रंथात उल्लेख केला होता. या नीतीमध्ये त्यांनी अशा काही गोष्टींचाही उल्लेख केला आहे, ज्यांच्याबद्दल कोणीही कधीही गर्व किवा अहंकार बाळगण्याची चूक माणसाने करू नये. आचार्य चाणक्यांनुसार जो कोणी या गोष्टींबद्दल बढाई मारतो, तो कालांतराने आपली विचार करण्याची आणि आकलन करण्याची क्षमता कमकुवत करतो. तर अशा ५ गोष्टींबद्दल जाणून घेऊया.



### संपत्ती आणि श्रीमंती

तुमच्याकडे आज पैसा आहे, याचा अर्थ असा नाही की तो उद्याही असेलच. पैसा स्वभावाने चंचल असतो आणि तो कधीही एका ठिकाणी स्थिर राहत नाही. अनेकदा जेव्हा लोक श्रीमंत होतात, तेव्हा ते इतरांना तुच्छ लेखू लागतात आणि आपल्या संपत्तीचे प्रदर्शन करतात. चाणक्यांनुसार जे लोक आपल्या संपत्तीबद्दल बढाई मारतात आणि गरिबांचा अनादर करतात, त्यांच्यावर देवी लक्ष्मी क्रोधित होते. काळानुसार अशा व्यक्तीची संपत्ती वाया जाते आणि त्याला प्रत्येक पैशासाठी संघर्ष करावा लागतो. म्हणून जेव्हा तुमच्याकडे संपत्ती असेल, तेव्हा तुम्ही नेहमी नम्र राहून इतरांना मदत केली पाहिजे.

### रूप आणि सौंदर्य

कोणीही आपल्या शारीरिक सौंदर्याबद्दल कधीही बढाई मारू नये. चाणक्यांचा विश्वास आहे की, सौंदर्य आणि तारुण्य या कायमस्वरूपी गोष्टी नाहीत. वाढत्या वयानुसार, चेहऱ्यावरील तेज आणि शरीराची शक्ती दोन्ही कमी होऊ लागतात. जो व्यक्ती केवळ इतरांच्या दिसण्यावरून त्यांची थट्टा करतो, तो समाजात आदर गमावतो. खरे सौंदर्य हे व्यक्तीच्या स्वभावात, चांगल्या वागणुकीत आणि विचारांमध्ये असते. जे लोक आपल्या बाह्य रूपाचा अभिमान बाळगतात, ते कालांतराने अनेकदा एकाकी पडतात.

### ज्ञान आणि बुद्धी

ज्ञानाचा उद्देश माणसाला शहाणा आणि नम्र बनवणे असतो, अहंकारी बनवणे नाही. पण काही लोक, थोडेसे ज्ञान किंवा शिक्षण मिळाल्यावर स्वतःला सर्वज्ञ समजू लागतात. इतरांच्या मतांचा आदर करणे थांबवतात, स्वतःला श्रेष्ठ समजू लागतात. चाणक्य म्हणतात की, जो व्यक्ती ज्ञानाचा अभिमान बाळगतो, त्याची मानसिक वाढ खुंटते. अशी व्यक्ती नवीन गोष्टी शिकणे थांबवते, ज्यामुळे तिच्या बुद्धिमत्तेत घट होते.

### पदाचा आणि उच्च दर्जा

आचार्य चाणक्य म्हणतात की, जेव्हा एखादी व्यक्ती समाजात किंवा नोकरीत उच्च पद किंवा अधिकार प्राप्त करते, तेव्हा तिचे वर्तन अनेकदा बदलते. ती तिच्या हाताखाली काम करणाऱ्यांना त्रास देऊ लागते. चाणक्याच्या मते, पद किंवा दर्जा नेहमी एकाच व्यक्तीकडे राहत नाही. आज तुमच्याकडे असलेला अधिकार उद्या दुसऱ्या कोणाकडे तरी असू शकतो. जे लोक आपल्या उच्च पदाच्या गर्वाने इतरांना दुखावतात.

### सत्ता आणि शक्ती

चाणक्य नीतीनुसार शारीरिक शक्ती किंवा सामर्थ्याचा गर्व देखील तुम्हाला विनाशाकडे नेऊ शकतो. आचार्य चाणक्याच्या मते जो व्यक्ती सत्तेच्या नशेत दुर्बळ आणि असहाय्य लोकांवर अत्याचार करतो, त्याचा अंत विनाशकारी होतो. त्यांनी असा युक्तिवाद केला, की अगदी महान आणि सर्वात शक्तिशाली राजांची साम्राज्ये देखील त्यांच्या गर्वामुळे कोसळतात. सत्तेचा योग्य वापर इतरांचे संरक्षण करण्यासाठी आहे, त्यांना घाबरवण्यासाठी किंवा त्रास देण्यासाठी नाही.

# शंख पूजेचे काय आहे आध्यात्मिक व आरोग्याबाबत महत्त्व ?

**ग्लोबल महातेज वृत्तसेवा**

शंखामधे १०० टक्के कॅल्शियम असल्याने यात रात्रभर पाणी भरून ठेवावे व ते सकाळी प्राशन करावे. त्यामुळे शरिरातील कॅल्शियममध्ये वाढ होते. शंखामध्ये बरेच औषधी गुणधर्म आहेत .

शंख वाजण्याच्या क्रियेने हृदयक्रिया, रक्तदाब, अस्थमा, मंदाग्नी या अनियमित आजारांवर लाभ होतो. फुफ्फुसे बळकट होतात. शंख ध्वनीमुळे आपल्या घरातील तसेच घरापासून १०० मीटरपेक्षा जास्त परिसरातील नकारात्मक ऊर्जा नष्ट होत असते . वास्तूदोष, नजरदोष, बाहेरील बाधा यापासून वास्तूचे संरक्षण होते. शंखातील पाणी प्यायल्याने मनोरुग्णाला उत्तेजना प्राप्त होऊन त्याला फायदा होतो. शंखाच्या ध्वनीने डोके, चेहरा, इतर शारीरिक स्नायूंच्या हालचालीत चांगली सक्रियता राहते. दक्षिणावर्ती शंखाला लक्ष्मीस्वरूप म्हटले जाते. याच्या नाद तरंगाशिवाय लक्ष्मीपूजन पूर्ण मानले जात नाही. समुद्रमंथनातून जी १४ रत्ने आली त्यात हे रत्न आहे जे सुख-सौभाग्य वाढीसाठी घरात स्थापित करतात. शंखात दूध भरून रुद्र अभिषेक केल्याने सर्व पापांचा नाश होतो. घरांत शंखनाद केल्याने नकारात्मक ऊर्जा व अतृप्त आत्म्यांचा वास राहत नाही. दक्षिणावर्ती शंखाने पितरांना तर्पण केल्याने पितरांची शांती होते. शंखाने स्फटिक यंत्रावर अभिषेक केल्याने लक्ष्मीप्राप्ती होते.



सोमवारी शंखामधे दूध भरून भगवान शिव यांच्या पिंडीवर ते अर्पण केल्याने बिघडलेला चंद्र ठीक होतो. मंगळवारी सुंदरकांड वाचल्यावर शंखनाद केल्याने मंगळाचा वाईट प्रभाव कमी होतो. शंखात तांदूळ भरून शंख लाल कापडात गुंडाळून तिजोरीत ठेवल्याने आई अन्नपूर्णेची कृपा कायम राहते. बुधवारी शाळिग्रामला तुळस व शंखामधून पाणी अर्पण केल्याने बिघडलेला बुध ग्रह ठीक होतो. शंखाला केशरयुक्त गंध लावल्याने भगवान श्रीविष्णू व गुरूंची प्रसन्नता मिळते. शंख पांढऱ्या कापडावर ठेवला असता शुक्र ग्रह बलवान होतो. शंखामधून सूर्यदेवांना पाण्याचे अर्घ्य दिल्याने सूर्यदेव प्रसन्न होतात. शंखाची नित्यपूजा केल्याने ऐश्वर्य प्राप्त होते.

**। पंचजन्याय विद्महें पवामानाय धीमहि तंनो शंख प्रचोदयात।**

# सूर्य शांती : सूर्य ग्रहाला प्रसन्न करण्यासाठी ५ विशेष उपाय

**ग्लोबल महातेज वृत्तसेवा**

सूर्य ग्रहाच्या शांतीसाठी सकाळी अंघोळ केल्यानंतर सूर्यदेवांना जल अर्पित केले जाते. नंतर सूर्य संबंधित वस्तूंचे दान, जप, होम मंत्र धारण व सूर्याच्या वस्तूंनी जल स्नान करणे देखील सूर्याच्या उपायांपैकी आहे. सूर्याच्या शांतीसाठी या पाच विधींपैकी एक विधी उपयोगात आणता येऊ शकते. गोचरमध्ये सूर्याचे अनिष्ट प्रभाव दूर करण्यासाठी हे उपाय विशेष रूपात प्रभावी ठरू शकतात.



**१) स्नानाद्वारे उपाय :** गोचरमध्ये सूर्य अनिष्टकारक असल्यास जातकांनी स्नान करताना पाण्यात खसखस किंवा लाल फूल किंवा केशर मिसळून अंघोळ करणे शुभ ठरते. खसखस, लाल फूल किंवा केशर या सर्व वस्तू सूर्याच्या कारक आहेत आणि सूर्याचे उपाय केल्याने अन्य अनिष्टांपासून बचावासह जातक आजाराला सामोरे जाण्यास सक्षम होतो. सूर्याचे उपाय केल्याने जातकाच्या वडिलांच्या आरोग्यात सुधार होण्याची शक्यता वाढते. सूर्याच्या वस्तूंनी स्नान केल्यावर सूर्याच्या वस्तूंचे गुण व्यक्तीच्या शरीरात प्रवेश करतात आणि त्याच्या शरीरात सूर्याच्या गुणांमध्ये वृद्धी करतात.

**२) दान :** सूर्य वस्तूंनी स्नान करण्याव्यतिरिक्त सूर्य वस्तूंचे दान केल्याने देखील सूर्याच्या अनिष्टापासून वाचता येते. यात तांबे, गूळ, गहू, मसूरडाळ दान करता येते. हे दान प्रत्येक रविवारी किंवा सूर्य संक्रांतीच्या दिवशी करणे योग्य ठरते. सूर्य ग्रहणाच्या दिवशी देखील सूर्य वस्तूंचे दान करणे फायदेशीर ठरते. या उपाय अंतर्गत सर्व वस्तूंचे दान सोबत करता येऊ शकते. दान करताना वस्तूंचे वजन आपल्या सामर्थ्यानुसार करता येते. आपल्या संचित धनातून दान करणे अधिक योग्य ठरते. ज्या जातकानिमित्त दान केले जात असेल ती व्यक्ती दान देण्यात सक्षम नसेल अर्थात वयाने लहान असल्यास किंवा इतर काही कारणामुळे त्या व्यक्तीच्या हाताने दान करणे शक्य नसल्यास कुटुंबातील जवळीक व्यक्ती त्या जातकाच्या निमित्ताने दान करू शकतात. दान करताना सूर्य देवांवर पर्ण विश्वास आणि श्रद्धा असणे आवश्यक आहे. आस्था नसल्यास कोणत्याही उपायाचे पूर्ण शुभ फल प्राप्त होत नाही.

**३) मंत्र जप :** सूर्य उपायांपैकी मंत्र जप देखील एक उपाय आहे. सूर्य मंत्रांमध्ये ‘ॐ घृणिः सूर्य आदित्यः मंत्र’ जप केला जातो. या मंत्राचा जप दररोज करता येतो. तसेच प्रत्येक रविवारी जप करणे विशेष शुभ प्रदान करणारे ठरते. दररोज जप करण्यासाठी मंत्रांची संख्या १०, २० किंवा १०८ असावी. मंत्रांची संख्या वाढविता देखील येऊ शकते तसेच सूर्य संबंधित इतर कार्य जसे हवनात या मंत्राचा जप करणे शुभ ठरते. मंत्राचा जप करताना व्यक्तीला शुद्धतेचे पूर्ण लक्ष ठेवणे गरजेचे आहे. मंत्र जपताना जातकांनी सूर्य देवांचे ध्यान करत राहावे. मंत्र जपताना एकाग्रता ठेवावी. यात मधून उठणे योग्य नाही.

**४) सूर्य यंत्र स्थापना :** सूर्य यंत्राची स्थापना करण्यासाठी सर्वांत आधी तांब्याचे पत्र किंवा भोजपत्रावर विशेष परिस्थितीत कागदावर सूर्य यंत्र निर्माण केले जाते. सूर्य यंत्रात समान आकाराचे ९ ब्लॉक तयार केले जातात. यात निर्धारित संख्या लिहिली जाते. वरील ३ खंडांत ६, १, ८ संख्या क्रमशः वेगवेगळ्या खंडात असावी. मध्य भागात ७, ५, ३ संख्या लिहिल्या जातात आणि शेवटच्या खंडात २, ९, ४ लिहिले जाते. या यंत्राच्या संख्यांची विशेषता आहे की यांचा सम कोणत्याही खंडाशी केल्यास बेरीज १५ असेल. संख्या निश्चित वर्गात लिहिलेली असावी.

तांब्याच्या पत्रावर कप्पे तयार करून संख्या लिहिणे किंवा भोजपत्रावर किंवा कागदावर लाल चंदन, केशर, कस्तुरी द्वारे खंड तयार करावे. डाळिंबाच्या लेखणीने खंड तयार करणे अधिकच उत्तम ठरेल. सर्व ग्रहांचे यंत्र तयार करण्यासाठी या वस्तूंनी आणि पदार्थांनी लेखन केले जाते.

**५) सूर्य हवन करणे :** सूर्य मंत्र हवनात प्रयोग करता येईल. हवन करण्यासाठी जाणकार पंडितांचा सल्ला घ्यावा. सूर्य कुंडलीत आरोग्य शक्ती व वडिलांचे कारक ग्रह असतात. जन्मकुंडलीत सूर्याचे दुष्प्रभाव प्राप्त होत असल्यास सूर्य राहू-केतूने पीडित असल्यास सूर्य संबंधित उपाय करणे फायदेशीर ठरते. विशेष म्हणजे हे उपाय सूर्य गोचरमध्ये शुभ फल देण्यात सक्षम नसल्यास यातून कोणताही उपाय करता येतो.

या व्यतिरिक्त सूर्य गोचरमध्ये सहाव्या घराचा स्वामी किंवा सातव्या घराच्या स्वामीवर आपली दृष्टी टाकत त्याला पीडित करत असल्यास या उपायांनी कष्टांपासून मुक्ती मिळते.

# बहु हिंडता सौख्य होणार नाही। सिणावे परी नातूडे हित काही ।

## मना सज्जना...

**परम स्नेही मित्र हो,**

श्लोक क्र. ४१

**बहु हिंडता सौख्य होणार नाही ।**
**सिणावे परी नातूडे हित काही ।**
**विचारे बरे अंतरा बोधवीजें ।**
**मना सज्जना राघवी वस्ती कीजें ।।४१।।**

या श्लोकातील पहिले दोन चरण पाहूया.

‘बहु हिंडता सौख्य होणार नाही’.

समर्थ मनाच्या चंचल स्वभावाला लक्षात घेऊन समजावणीच्या मृदू स्वरात सांगतात, की असे विनाकारण, विना प्रयोजन हिंडणे हे बरे नाही. अनावश्यक पायपीट करणे बरे नाही. ज्यातून काहीही निष्पन्न होणार नाही, अशी फुकाची पायपीट का म्हणून करावी. ? आपल्या कवयित्री बहिणाबाईंनी साध्या-सोप्या शब्दांत ही मनाची चंचलता अचूक पकडली आहे. त्या म्हणतात,

**मन पाखरू-पाखरू**
**त्याची काय सांगू मात**
**आता होतं भुईवर**
**गेलं गेलं आभायात...**

**मन चप्पय चप्पय**
**त्याले नाही जरा धीर**
**तठे व्हायिसनी ईज**
**आलं आलं धर्तीवर...**

तसे पाहिले तर चंचलता मनाचा हा स्थायीभाव आहे. बसल्या जागी हजारो विचार आपल्या मनात घोंगावत असतात. विचारांच्या लाटा मागून लाटा येत राहतात. त्यामुळे मानसिक थकवा येतो. आधुनिक मानसतज्ज्ञ सांगतात, की दिवसभरात शेकडो विचार व्यक्तीच्या मनात येत असतात. त्याने मेंदू थकतो. हा थकवा शारीरिक थकव्यापेक्षा जास्त असतो. मनाच्या या स्वैर हिंडण्याने हाती काहीही येत नाही. मग का म्हणून मनाने असे स्वैर हिंडावे ?

‘सिणावे परी नातुडे हित काही’...

हे स्वैर हिंडणे मनाच्या आणि व्यक्तीच्या हिताचे नाही.

रणांगणावर आप्तस्वकीय यांना पाहून अर्जुनाच्या मनात आलेला विषाद दूर करताना भगवंतांनी त्याला मार्गदर्शन केले. तेव्हा अर्जुनाने मनाच्या चंचल स्वभावाचे वर्णन केले ते माउलींच्या शब्दांत असे-

**जे विवेकाशी भुलवी ।**
**संतोषासी चाड लावी ।**
**बैसिजे तरी हिंडवी ।**
**दाही दिशा ।।**

अर्जुन भगवान श्रीकृष्ण यांना विनवतो, की हे मन इतके चंचल आहे की त्याच्यावर नियंत्रण मिळविणे अवघड आहे. एका जागी स्थिर वाटले



तरी ते दाही दिशा भटकत असते. त्यावर नियंत्रण कसे मिळविणार ? तेव्हा भगवंतांनी त्याला ‘विवेक’ आणि ‘वैराग्य’ यांच्या माध्यमातून मनाला नियंत्रणात ठेवता येते, असे मार्गदर्शन केले आहे.

इथे समर्थ तिसऱ्या चरणात ‘मनालाच’ विवेक आणि विचाराने बोध करावयाचे आवाहन करतात.

**‘विचारे बरे अंतरा बोधवीजें ।’**

समर्थांनी दासबोधात अंतकरण पंचक सांगितले आहे. मन, बुद्धी, चित्त, अहंकार आणि अंतकरण. हे पाचही घटक प्रत्यक्षात दृष्टीस दिसत नाहीत. परंतु यांची सर्व सत्ता आपल्या देहावर असते. प्रथम मन संकल्प विकल्प करते. बुद्धी त्याचे परिशीलन करते. अहंकार त्याची अंमलबजावणी, कृती करतो. हे सारे अंतःकरणापर्यंत पोहोचते.

म्हणून प्रथम मनालाच बोध करायला हवा. तो बोध कसा असावा ? तर विचारी आणि विवेकी असावा. मनानेच मनाला विवेकाच्या आधारे बोधित करून सार असार ओळखून, बरे-वाईट ओळखून, त्याचे परिणाम लक्षात घेऊन प्रत्यक्षात कृती आणि अंमलबजावणी करायची आहे.

**‘अत्त दीप भवः... तू स्वयं दीप हो!’**

प्रत्येक व्यक्तीच्या अंतःकरणात सदसदविवेक बुद्धीचा एक ईश्वरी दीप जागृत असतो. तो विवेकाचा, विचाराचा असतो. तो सतत पेटलेला राहिला तर माणूस कधीही भरकटत नाही. पण तो विवेकाचा दीप विझला, की अंधार वाढतो आणि मग विकाराची काळी सावली मनावर पसरते.

**जैसे दीप कालिका धाकूटी ।**
**परी बहु तेजाते प्रगटी ।**
**तैसे सद्बुद्धी थोटकी म्हणू नये ।।**

अशी एक माऊलींची एक ओवी आहे. इवलीशी पणती आपल्या तेजाने आसमंत उजळून टाकते. त्याचप्रमाणे सदबुद्धीचे असणे आपल्या मनाच्या गाभाऱ्याला उजळून टाकते. इवलीशी आहे म्हणून त्या पणतीचे महत्त्व कमी होत नाही. म्हणून मनाने या सदबुद्धीची साथ सोडू नये. परंतु मनाला हे केव्हा शक्य होते, यासाठी एकांत हवा. या एकांतात साधनेने मनाला स्थिरता आणता येते. एकदा मन स्थिर झाले, की त्याच्यावर नियंत्रण मिळविणे सोपे होते. शेवटी व्यक्ती म्हणजे देह जरी असला तरी अप्रत्यक्षपणे ते ‘मनच’ असते.

स्वामी विवेकानंद यांच्या जीवनातील एक प्रसंग आहे. एकदा ते अमेरिकेत व्याख्यानासाठी गेलेले असताना स्वामीजी वेळेवर सभास्थानी पोहोचले. परंतु तेथे काही कारणास्तव सभेला उशीर असल्याने कार्यक्रमाचे आयोजकांनी त्यांना एका खोलीत बसायला सांगितले. त्याप्रमाणे स्वामीजी त्या खोलीत बसले. सुमारे अर्धा तास त्या खोलीत ते एकटेच होते. सभेची वेळ झाली तेव्हा त्यांना आयोजकांपैकी जोसेफाईन मॅक्लिऑर्ड व अन्य सभासद भगिनींनी त्यांना व्यासपीठावर यायची विनंती केली.

स्वामीजी उठले आणि बाहेर येण्यापूर्वी त्यांनी खोलीतील आरशात पाहून चेहऱ्यावरून हात फिरवला. फेटा आणि पोशाख नेटका केला. पुन्हा आरशात पाहून ते बाहेर आले. आयोजकांपैकी एका भगिनीला आश्चर्य वाटले स्वामीजींसारखा संन्यासी आरशात पाहतो, हे त्या भगिनीला खटकले. तिने त्यांना या कृतीचे कारण विचारले. तेव्हा स्वामीजी म्हणाले,

‘सुमारे अर्धा तास मी या खोलीत एकटाच होतो. या काळात माझे देहभान हरपले होते. मी पूर्णब्रह्म भावात बुडून गेलो होतो. जणू काही समाधीत होतो. आता मी आरशातील माझ्या प्रतिमेला वारंवार बजावले, की तू ब्रह्म नाहीस. तू नरेंद्रनाथ आहेस. तू देह आहेस, तू ‘मन’ आहेस. स्वतःला पुन्हा शब्दांच्या जगात आणण्याचा मी प्रयत्न करीत होतो.

संत आणि महापुरुष यांनी मनाला ओळखून त्यावर योग्य प्रकारे नियंत्रण केले. त्यामुळे त्यांना आपल्या जीवनात भरीव लोकोपयोगी काम करता आले.

मनाला विवेकाचा बोध झाला, त्याची भटकंती थांबली आणि अंतःकरण निर्मळ झाले की त्या रिकाम्या जागी कोणाची वस्ती व्हावी ? समर्थांचे उत्तर पुढील चरणात आहे –

**‘मना सज्जना राघवी वस्ती कीजे.’**

**जय जय रघुवीर समर्थ!**

**भाऊसाहेब देशमुख, अमळनेर**
**मो. : ९४२०३ ८९५४१**

(वरील माहिती विविध धर्मग्रंथांतून संकलीत केली आहे.)